आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता

३ मार्च २०२५ सोमवार

**ठळक बातम्या**

- महाराष्ट्र राज्य विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाला राज्यपालांच्या अभिभाषणाने प्रारंभ/ ६ हजार ४८६ कोटी २० लाख रुपयांच्या पुरवणी मागण्या दोन्ही सभागृहात सादर

- जागतिक वन्यजीव संरक्षण दिनानिमित्त सर्वत्र विविध कार्यक्रम/ प्रधानमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली राष्ट्रीय वन्यजीव मंडळाची सातवी बैठक संपन्न

- ग्रामीण भागाला समृद्ध बनवण्यासाठी दुग्धोत्पादन क्षेत्राचं मोठं योगदान असल्याचं केंद्रीय सहकार मंत्र्यांचं प्रतिपादन

**आणि**

- यंदाच्या ऑस्कर सोहळ्यात शॉन बेकर दिग्दर्शित ‘अनोरा’ या चित्रपटाला सर्वात जास्त ५ पुरस्कार.

**<><><><><>**

महाराष्ट्रात विधीमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाला राज्यपालांच्या अभिभाषणाने आजपासून मुंबईत सुरुवात झाली. सर्व समाज घटकांना सोबत घेऊन सर्वसमावेशक, प्रगतीशील, पुरोगामी आणि विकसित महाराष्ट्र घडविण्यासाठी राज्य सरकार कार्यरत असल्याचं प्रतिपादन राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी अभिभाषणात केलं. यावेळी त्यांनी राज्य सरकारच्या विविध योजनांचा आढावा घेतला.

देशाच्या एकूण स्थूल देशांतर्गत उत्पादनात राज्याचं १४ टक्क्यांपेक्षा अधिक योगदान आहे. थेट परकीय गुंतवणुकीसाठी महाराष्ट्राला पहिली पसंती असल्याचं ते म्हणाले. यावेळी दावोसमध्ये झालेल्या १५ लाख कोटी रुपयांपेक्षा अधिक रकमेच्या सामंजस्य करांराचा आणि त्यातून निर्माण होऊ शकणाऱ्या १५ लाखांहून अधिक रोजगाराच्या संधीचा उल्लेख त्यांनी केला. उद्योगांना चालना देण्यासाठी आणि रोजगाराच्या संधी निर्माण करण्यासाठी ५ हजार कोटी रुपयांचे अनुदान वितरीत करण्याची राज्य सरकारची योजना आहे. उद्योगांसाठी साडे ३ हजार एकर औद्योगिक भूखंड वितरीत करण्याचा निर्णय सरकारनं घेतला असल्याचं राज्यपाल म्हणाले. मराठी भाषेला अभिजात दर्जा दिल्याबद्दल राज्यपालांनी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि केंद्र सरकारचे आभार मानले. राज्य सरकार या अंतर्गत उत्कृष्टता केंद्र आणि अनुवाद प्रबोधिनी स्थापन करणार असल्याची माहिती त्यांनी दिली. महाराष्ट्र कर्नाटक सीमा प्रश्न सोडवण्यासाठी होत असलेल्या प्रयत्नांबद्दल ते म्हणाले…

**होल्ड - बाइट राज्यपाल…. व्हिसी**

त्यानंतर दोन्ही सभागृहांचं कामकाज सुरु झालं. राज्यपालांच्या अभिभाषणावरचा आभार प्रस्ताव दोन्ही सभागृहात मांडण्यात आला. राज्य सरकारनं अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी ६ हजार ४८६ कोटी २० लाख रुपयांच्या पुरवणी मागण्या आज दोन्ही सभागृहात सादर केल्या. विधानसभेत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी या मागण्या मांडल्या. त्यात सर्वाधिक ३ हजार कोटी रुपयांहून अधिक मागण्या ग्रामविकास विभागाच्या आहे. प्रधानमंत्री आवासन योजनेसाठी पावणे ४ हजार कोटी

आणि मुख्यमंत्री बळीराजा वीज दर सवलत योजनेसाठी २ हजार कोटी रुपयांची तरतूद यात आहे. या मागण्यांवर ६ आणि ७ मार्च रोजी चर्चा आणि मतदान होणार आहे. विधानसभेत अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी तालिका सदस्य म्हणून योगेश सागर, बबनराव लोणीकर, दिलीप बनकर, सुनील राऊत, अमित झनक यांच्या नावांची घोषणा केली. त्यानंतर माजी प्रधानमंत्री डॉ मनमोहन सिंग तसंच प्रदीप जाधव नाईक, मुकुंदराव मानकर, उपेंद्र शेंडे, तुकाराम बिरकड यांना सर्व सदस्यांना आदरांजली वाहिली आणि सभागृहाचं कामकाज तहकूब झालं. विधानपरिषदेत निरंजन डावखरे, चित्रा वाघ, कृपाल तुमाणे, अमोल मिटकरी, राजेश राठोड आणि सुनील शिंदे यांची तालिका सदस्य म्हणून नेमणूक केल्याचं सभापती राम शिंदे यांनी जाहीर केलं. कृषी मंत्री माणिकराव कोकाटे यांना न्यायालयानं २ वर्षांची शिक्षा सुनावली आहे. याप्रकरणी न्यायालयाचा निर्णय आल्यावर राज्यपाल किंवा विधानसभा निर्णय घेईल, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विरोधी पक्ष नेते अंबादास दानवे यांनी उपस्थित केलेल्या मुद्यावर सांगितलं. त्यानंतर विधानपरिषदेत मनमोहन सिंग यांच्यासह माजी सदस्य धनश्याम दुबे, नारायण वैद्य, सुभाष चव्हाण यांच्या निधनाबद्दल शोक प्रस्ताव सभापती राम शिंदे यांनी सादर केला. शोक प्रस्ताव मंजूर केल्यावर विधान परिषदेचं कामकाजही उद्यापर्यंत तहकूब झालं.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली आज गुजरातमध्ये सासन गीर इथं राष्ट्रीय वन्यजीव मंडळाची सातवी बैठक झाली. या बैठकीमध्ये

लष्करप्रमुख, विविध राज्यांचे सदस्य, या क्षेत्रात काम करणाऱ्या स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी, मुख्य वन्यजीव वॉर्डन आणि विविध राज्यांचे सचिव अशा ४७ सदस्यांचा समावेश होता. या बैठकीत प्रधानमंत्र्यांनी जुनागढ इथं वन्यजीवांसाठीच्या राष्ट्रीय संदर्भ केंद्राची पायाभरणी केली. तसंच, सोळावा आशियाई सिंहगणना अहवाल, तसंच मानव-वन्यजीव संघर्ष व्यवस्थापन कार्यक्रम 'सॅकोन'चं अनावरण केलं. तत्पूर्वी प्रधानमंत्र्यांनी गीर राष्ट्रीय उद्यानाची सफर केली आणि नंतर वृक्षारोपण कार्यक्रमात सहभाग घेतला. वन कर्मचाऱ्यांना गस्तीसाठी उपयुक्त ठरणाऱ्या दुचाकी वाहनांनाही त्यांनी हिरवा झेंडा दाखवला. त्यानंतर त्यांनी तिथल्या कर्मचाऱ्यांशी संवाद साधला. आज जागतिक वन्यजीव संरक्षण दिवस आहे. पर्यावरण संतुलन, वन्यप्राण्याचं संरक्षण आणि संवर्धनासाठी प्रयत्न करण्याच्या उद्देशानं जागरुकता निर्माण करण्यासाठी आज देशभरात विविध उपक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे.

**<><><><><>**

वेव्ज समिट २०२५ अंतर्गत संगीत क्षेत्रासाठी बॅटल ऑफ बँड्स स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. प्रसार भारती आणि सारेगामा यांनी संयुक्तरित्या या स्पर्धेचं आयोजन केलं असून त्यात विविध बँड्सना आपली कला सादर करण्याची संधी मिळणार आहे. या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी काही अटी असून त्यात एका गायकासह जास्तीत जास्त पाच सदस्य असलेला बँड असणं अनिवार्य आहे. स्पर्धक बँडला आपला २ मिनिटांचा गाण्याचा व्हिडीओ चित्रित करून तो दूरदर्शनच्या अधिकृत संकेतस्थळावर

नोंदणी करून अपलोड करावा लागेल. निवड झालेल्या बँडना या स्पर्धेत सहभागी होता येईल. माहिती आणि प्रसारण मंत्रालयानं आयोजित केलेल्या वेव्ज या कार्यक्रमाचा हा उपक्रम १ ते ४ मे दरम्यान मुंबईत होणार आहे.

**<><><><>**

दुग्धोत्पादन क्षेत्र देशाच्या विकासाला गती देत असून ग्रामीण भागाला समृद्ध बनवण्यासाठी दुग्धोत्पादन क्षेत्राचं मोठं योगदान असल्याचं मत केंद्रीय गृृह आणि सहकार मंत्री अमित शहा यांनी व्यक्त केलं. त्यांनी आज नवी दिल्लीत भारत मंडपम इथं ‘दुग्धोत्पादन क्षेत्रात शाश्वतता आणि वितरण क्षमता’ या विषयावर आयोजित कार्यशाळेचं उद्घाटन केलं. श्वेतक्रांती २ च्या दिशेनं देश वाटचाल करत असल्याचं ते म्हणाले. गावाकडून शहरांकडे होणारं स्थलांतर रोखण्यासाठी छोट्या शेतकऱ्यांना समृद्ध बनवणं गरजेचं असून त्यासाठी दुग्धोत्पादन क्षेत्र हा एकमेव उपाय असल्याचं त्यांनी नमूद केलं. या कार्यशाळेदरम्यान, अनेक राज्यांमध्ये बायोगॅस संयंत्रांच्या स्थापनेसाठी सामंजस्य करार करण्यात आले.

**<><><><>**

परराष्ट्रव्यवहार मंत्री डॉ. एस जयशंकर यांनी आज बेल्जियमचे परराष्ट्रव्यवहार मंत्री मॅक्झिम प्रेव्हॉट यांच्याशी नवी दिल्लीत चर्चा केली.दोन्ही देशांदरम्यान व्यापार उद्योग शिक्षण, नवोन्मेष आणि सांस्कृतिक क्षेत्रातले संबंध दृढ करण्याबाबत ते एकमेकांशी बोलले. कृत्रिम बुद्धिमत्ता, हरित ऊर्जा आणि सेमीकंडक्टर हे महत्त्वाचे मुद्देही चर्चेत होते असं डॉ. जयशंकर यांनी सांगितलं. बेल्जियमच्या राजकन्या अस्ट्रिड यांच्याशी देखील आज ते चर्चा करणार आहेत. राजकन्या अस्ट्रिड यांनी बेल्जियमचे संरक्षण

मंत्री थिऑ फ्रँकन यांच्यासह आज संरक्षण मंत्री राजनाथ सिंग यांच्याबरोबर महत्त्वपूर्ण बाबींवर चर्चा केली. राजकन्या अस्ट्रिड ७ दिवसांच्या भारत दौऱ्यावर आल्या असून उद्या त्या प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांची भेट घेणार आहेत.

**<><><><><>**

९७ वा अकादमी पुरस्कार सोहळा काल अमेरिकेत लॉस एंजेलिसमध्ये संपन्न झाला. शॉन बेकर यांनी दिग्दर्शित केलेल्या अनोरा या चित्रपटाने सर्वात जास्त ५ पुरस्कार जिंकले. या चित्रपटाला सर्वोत्कृष्ट चित्रपट, सर्वोत्कृष्ट दिग्दर्शक, सर्वोत्कृष्ट पटकथा, सर्वोत्कृष्ट संपादन आणि सर्वोत्कृष्ट अभिनेत्री हे पुरस्कार मिळाले. ‘द ब्रुटलिस्ट’ साठी **ॲ**ड्रियन ब्रॉडी हा सर्वोत्कृष्ट अभिनेता या ऑस्करचा मानकरी ठरला. तर मिकी मॅडिसननं ‘अनोरा’ साठी सर्वोत्कृष्ट अभिनेत्रीचा ऑस्कर जिंकला. ‘**ॲ**मिलिया पेरेझ’ मधल्या भुमिकेसाठी झोई साल्दाना हिला सर्वोत्कृष्ट सहाय्यक अभिनेत्रीचा ऑस्कर मिळाला. तिचा हा पहिला अकादमी पुरस्कार आहे. 'अ रिअल पेन' मधल्या अभिनयासाठी किरन कल्किननं सर्वोत्कृष्ट सहाय्यक अभिनेत्याचा ऑस्कर जिकंला. सर्वोत्कृष्ट माहितीपटासाठीचा ऑस्कर 'नो अदर लँड' ला मिळाला'अनुजा' या भारतीय लघुपटाला लाइव्ह **ॲ**क्शन लघुपटाच्या श्रेणीत ऑस्कर २०२५ साठी नामांकन मिळाले होतं. मात्र आय **ॲ**म नॉट रोबोट' या चित्रपटाला या श्रेणीत ऑस्कर मिळाल्यामुळे भारताची ऑस्कर पुरस्कार मिळवण्याची संधी हुकली आहे.

**//<><><><><>//**